जिल्हा पशुसवर्धन उपआयुक्त, हिंगोली यांचे कार्यालय,
S-3 मध्यवर्ती प्रशासकिय ईमारतहिंगोली ,नांदेड रोड ,- 431 513
E..Mail : dccahhingoli@gmail.com

जा.क्र. जि.प.स.उ.आ.हि/तां/3193 /2024 दि. 25.09.2024

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, हिंगोली या कार्यालयातील भांडारातील निरूपयोगी निर्लेखन झालेल्या द्रवनपात्रांचा लिलाव दिनांक 04/10/2024 रोजी सकाळी 11:00 वाजता**

**अटी व शर्ती**

१. भाग घेणा-यास अनामत रक्कम रू. 10,000/- धनाकर्षाच्या/नगदी स्वरूपात भरावी लागेल.

२. लिलावात सहभागी होणा-या बोलीधारकाने धनाकर्ष व इतर अनुषंगीक कागदपत्रे लिलावाचे ठिकाणी सादर करण्याची वेळ **दिनांक 04/10/2024 रोजी सकाळी 10.30** वाजेपर्यंत असेल. त्यानंतर सहभागी होणा-या बोलीधारकांचे धनादेश व इतर कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

3. सदरची रक्कम अयशस्वी लिलावधारकास लिलाव पुर्ण होताच परत करण्यात येईल.

४. यशस्वी लिलावधारकास अनामत रक्कम लिलावाची रक्कम पुर्ण भरल्यानंतर परत करण्यात येईल.

५. लिलाव तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल.सर्व वस्तूंची मिळून बोली बोलावी लागेल विशिष्ट वस्तुसाठी बोली बोलता येणार नाही.

६. लिलावाध्ये ज्या बोलीधारकाची बोली सर्वाधिक असेल त्यांच्याच नांवाने लिलाव तिन वेळा बोली पुकारून लिलावास अंतिम मंजूरी देण्यात येइल.

७. अंतिम लिलाव ज्यांचे नांवे मंजूर होईल त्या व्यक्तीने लिलावाची संपुर्ण रक्कम जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त ,हिंगोली कार्यालयाच्या खालील बँक खात्यात आरटिजीएस अथवा धनाकर्षाव्दारे जमा करावी. पुर्ण रक्कम तावडतोब जमा न केल्यास त्या व्यक्तीची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचा माल नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तीस देण्यात येईल.रक्कम भरावयाचा खात्याचा तपशील खालीलप्रमाणे:-जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हिंगोली यांचे District Deputy Commissioner of Animal Husbandary Hingoliया नांवे स्टेट बँक ऑफ इंडिया,अकोला रोड, शाखा हिंगोली येथे असलेल्या **खाते क्र 52068255853 आयएफएससी कोड SBIN0020018**

८. अंतिम लिलाव ज्याचे नांवे मंजूर होईल त्यांनी लिलावातील संपुर्ण वस्तुंची वाहतूक स्वता:चे वाहनाने त्याच दिवशी करावयाची आहे. या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे वाहन,हमाल,मदतनीस मिळणार नाही तसेच लिलाव अंतिम झालेल्या वेळेपासून मालाची प्रत्यक्ष वाहतूक करेपर्यंत लिलावाच्या वस्तूंचे संरक्षण,बोलीधारकाने स्वत: करावयाचे आहे या कालावधीत लिलावातील कोणत्याही वस्तू गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही.

९. लिलावामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तु चेपून टाकण्यात येतील व त्या वस्तू जशा आहेत तशाच व यथास्थितीत घ्याव्या लागतील. लिलावाच्या वस्तू अगोदरच पाहून घ्याव्यात नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

१०.लिलावात सहभागी होणा-याने स्वत:ची ओळख,त्याचा पत्ता या पुष्टयर्थ कागदपत्रे सादर करावी लागतील उदा.पॅनकार्ड आधारकार्ड,निवडणूक ओळखपत्र,वीजबील इ.

११. खरेदी दारांनी त्यांच्या पॅनक्रमांक व टॅन क्रमांकाची प्रत सादर करावी.

१२. एखादया व्यक्तीस दुसऱ्याच्या वतीने अथवा कंपनी तर्फे बोली बोलायची असेल तर बोली बोलणाऱ्या व्यक्तीने ठरावीक नमुन्यात अधिकारपत्र पॉवर ऑफ अर्टनी दाखल करावी लागेल तरच बोली बोलता येईल. भागीदार असेल तर भागीदार पत्राची सांक्षाकीत प्रत दाखल करवी लागेल तरच त्यांना बोली बोलता योईल.

Scanned with OKEN Scanner

१३.लिलाव खरेदी दराने विक्री किंमतीचा भरणा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हिंगोली यांचे नावाने रोखीकृत होईल अशा तऱ्हेने काढावा. वरील शर्ती व अटींचा भंग केल्यास व शासनाची 1/4 व 3/4 रक्कम विहित मुदतीत न भरल्यास एकुण खरेदी किमतीवर 10 टक्के आयकर लावण्यात येईल.

१४. सर्व बोलीधारकास पॅन कार्डची छायांकित सत्यप्रत (Self Attested)देणे अवश्यक अहे.पॅन कार्ड नसेल तर 20 टक्के आयकर आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१५. लिलावची बोली रु. 1000/- च्या पटीतच बोलावी लागेल.लिलवात सर्वात जास्त किंमतीची बोली समितीस मान्य असल्यास तिनदा बोलुन सदरची बोली निश्चित करण्यात येईल.

१६.लिलाव मंजुर झालयानंतर सदर द्रवनत्रपात्राची राखण करण्याची जबाबदारी लिलाव घेणाराची राहील.

१७.नैसर्गिक आपत्ती व इतर कारणामुळे लिलाव झालेल्या द्रवनत्रपात्राचे नुकसान झाल्यास विकत घेणारे/लिलाव घेणारे जबाबदार राहतील व हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

१८.लिलावात अंतर्भुत द्रवनत्रपात्राची मोजणी / नोंदवही नुसार असुन या मधे कंमी/जास्त फरक असू शकतो.बोलीदाराने प्रत्यक्ष पाहणी करुन बोली बोलावी. द्रवनत्रपात्राच्या तफावतीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१९.द्रवनत्रपात्राचा लिलाव पुर्ण झाल्यानंतर मालाची उचल/ने-आण इत्यादी संपुर्ण बाबी विहीत नियमानुसर व संबंधीत विभागच्या देखरेखी खाली करण्यची जबाबदारी बोली धारकाची राहील.

२०.लिलावातील सर्व द्रवनत्र पात्रे घेऊन जाण्याची जबाबदारी यशस्वी बोलीधारकाची राहील.

२१.यशस्वी बोलीधारकांना आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 3 दिवसच्या आत सर्व द्रवनत्रपात्राची उचलन/ने-आण इत्यादी संपुर्ण बाबी पुर्ण कराव्या लागतील.

२२.यशस्वी बोलीधारकाने लावण्यात आलेल्या बोलीच्या रक्कमेपैकी 50 % रक्कम त्याच दिवशी कार्यालयात जमा करावी व उर्वरीत रक्कम तीन दिवसाच्या आत कार्यालयात जमा करुन असलेल्या स्थितीत सदर साहित्य ताब्यात घ्यावे लागेल.

२३.लिलावास अंतिम मंजूरी देणे अथवा लिलाव नाकारणे,स्थगीत करण्याचा किंवा लिलाव प्रक्रीया रदद करण्याचा पुर्ण अधिकार लिलाव समितीस असेल तो सर्व बोलीधारकांस बंधनकारक राहील.

२४.लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणत्याही प्रकारची वाद उदभवल्यास याबाबतचा अंतिम निर्णय हा अध्यक्ष लिलाव समिती यांचा असेल व सर्व बोलीधारकांस तो बंधनकारक राहिल.

२५. वरील अटी व शर्ती मंजूर असणा-या खरेदीदारालाच लिलावात भाग घेता येईल.

**लिलावाचे ठिकाण- जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,हिंगोली**

अध्यक्ष तथा जिल्हा व्यवस्थापक
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
हिंगोली

Scanned with OKEN Scanner

जिल्हा पशुसवर्धन उपआयुक्त, हिंगोली यांचे कार्यालय,
S-3 मध्यवर्ती प्रशासकिय ईमारतहिंगोली ,नांदेड रोड ,- 431 513
E..Mail : dccahhingoli@gmail.com

जा.क्र. जि.प.स.उ.आ.हि/तां/ 3192/2024 दि. 25.09.2024

# जाहिर लिलाव

निरूपयोगी द्रवनत्रपात्रे खरेदी करण्या-या इच्छुक व्यक्ती/खरेदीदार यांना सुचना देण्यात येते की, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र हिंगोली ,जि .हिंगोली या कार्यालयांतर्गत 'नरूपयोगी, निर्लेखीत केलेली खालीलप्रमाणे विविध साईजची द्रवनत्रपात्रे जाहिर लिलावाव्दारे विक्री करावयाची आहेत.सदर द्रवनत्रपात्रे इच्छुकांना ज्या स्थितीत आहेत ज्या स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलावाच्या साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे---

| अक्र | लिलावाचा दिनांक | द्रवनत्रपात्रांचा प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| 1. | **04/10/2024** | 55-TA | 111 |
| 2 | | IN50 – | 155 |
| 3 | | 20-BA | 57 |
| | | Jambo-12 | 27 |
| | | BA-3 | 63 |
| 4 | | 3-IR | 73 |
| | | एकूण | 486 |

त्याकरीता दिनांक **04/10/2024** रोजी सकाळी ११.०० वाजता **जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र.हिंगोली** येथे जाहिर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या संस्था/कंपन्या/व्यापारी यांना निरुपयोगी द्रवनत्रपात्रे खरेदी करावयाची असतील अश्या संस्था/कंपन्या/व्यक्तींनीच भाग घ्यावा. भाग घेण्यासाठी इच्छुकांनी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हिंगोली यांचे नांवे रू.10,000/-(अक्षर रूपये दहा हजार केवळ)चा धनाकर्ष पेऐबल अॅक्ट / **नगदी** हिंगोली नांवे सादर करणे आवश्यक आहे. जाहिर लिलावासाठी गठित जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतीम असेल. लिलावानंतर विक्री करावयाची सर्व द्रवनत्रपात्रे हि चेपून मगच हस्तांतरीत करण्यात येतील जेणे करून त्याचा पुर्नवापर करणे शक्य होणार नाही. लिलाव ज्याचे नांवे होईल त्यांनाच द्रवनत्रपात्रे चेपून घ्यावी लागतील याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष तथा जिल्हा व्यवस्थापक
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
हिंगोली

Scanned with OKEN Scanner